| बीड-महाराष्ट्र | बुधवार दि.१ एप्रिल २०२६ | वर्ष ६ वे | अंक १३ | पान २ | पाने ४ | किंमत ३ रुपये

महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955 | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

| RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://marathwadapatra.com | https://epaper.marathwadapatra.com




## राज्य प्रशासनात मोठे फेरबदल

# तुकाराम मुंढेंची पुन्हा बदली!

**मुंबई । वृत्तसेवा**

आपल्या धडाकेबाज कार्यपद्धतीसाठी ओळखले जाणारे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांची पुन्हा एकदा बदली झाली आहे. सध्या मंत्रालयातील दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव म्हणून कार्यरत असणाऱ्या मुंढे यांच्याकडं नव्या बदलीच्या ठिकाणी तीन महत्वाच्या खात्यांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यामुळं आता या नव्या विभागामध्ये ते कशा पद्धतीनं सुधारणा घडवून आणतात हे पाहावं लागणार आहे.



### बदल्यांचा विक्रम

तुकाराम मुंढे हे २००५ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. तेव्हापासून आत्तापर्यंतच्या त्यांच्या २१ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांच्या २३ ते २४ वेळा बदल्या झाल्या आहेत. याचं मुख्य कारण राजकीय हस्तक्षेप मोडून काढणे, थेट आणि कठोर निर्णय घेणे तसंच भ्रष्टाचाराविरोधात त्यांनी उचललेली पावलं कारणीभूत आहेत. ते नेहमीच 'नो-नॉनसेंस' दृष्टिकोन ठेवतात, ज्यामुळं राजकीय नेत्यांशी अनेकदा त्यांचा संघर्ष झालेला आहे. ▶▶ पान २ वर

## मला खूप मारले, बदनाम केलं...

# प्रेम प्रकरणातून युवकाची आत्महत्या

**मांजरसुंबा । प्रतिनिधी**

गुन्हेगारी राज्यभरात कुप्रख्यात झालेला बीड जिल्हा आता पुन्हा एका आत्महत्येच्या घटनेमुळे चर्चेत आला आहे. जिल्ह्यातील मांजरसुंबा तालुक्यात एका तरुणाने प्रेम प्रकरणातून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. धुळे-सोलापूर महामार्गा लगतच्या एका टायर पंक्चरच्या दुकानात गळफास घेत आत्महत्या केली.याप्रकरणी चार आरोपींच्या विरोधात नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हाती आलेल्या माहितीनुसार, या तरुणाचं शेजारच्या गावातील तरुणी प्रेमाची नाळ जुळली. दिवसामागून दिवस गेले तसं त्याचे प्रेम बहरू लागले. त्यांच्या प्रेम संबंधाची कुणकुण मुलीच्या घरच्यांना लागली. त्यानंतर त्यांनी मुलीच्या प्रियकराला आपल्या गावात बोलवून घेतले. मुलीच्या घरच्यांनी बोलावल्यानंतर तरुण कोणता विचार न करता प्रियसीच्या गावात गेला. त्यावेळी मुलीच्या घरच्यांनी त्याच्याकडील बाईक आणि मोबाईल काढून घेतला. त्यानंतर चार जणांनी त्याला बेदम मारहाण केली. त्यानंतर तरुणाने सुसाईड नोट लिहीत धुळे-सोलापूर महामार्गालगतच्या एका टायर पंक्चरच्या दुकानात गळफास लावून आत्महत्या केली. तरुणाने लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये मुलीच्या घरच्यांवर गंभीर आरोप केले आहेत. मला खूप मारले, गावात चोरटा

### सुसाइड नोटमध्ये गंभीर आरोप



म्हणून बदनाम केले, तुला जिवे मारून टाकू अशा धमक्या दिल्या असल्याचं त्याने आपल्या नोटमध्ये म्हटलं. याप्रकरणी चार आरोपींच्या विरोधात नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसरीकडे तरुणाच्या आईनं एका धक्कादायक खुलासा केला आहे. मुलीच्या घरच्यांनी माझ्या मुलाला बोलावून घेतलं. त्याला झाडाला बांधून मारहाण केली. मारहाणीची व्हिडिओ काढला. मारहाण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी मृत तरुणाच्या आईने केली आहे.







## धनादेश अनादर प्रकरणी मुकादमाला

# एक वर्ष कारावास, आठ लाखांचा दंड

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने सोमवारी एका महत्त्वपूर्ण निकालात, अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याची फसवणूक करणाऱ्या प्रकाश भीमराव पवार या आरोपीला एक वर्ष सश्रम कारावास आणि ८ लाख १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. ऊस पुरवठ्याच्या कराराचा भंग करून कारखान्याची थकीत रक्कम देण्यासाठी दिलेला ४ लाख ५४ हजार ७१७ रुपयांचा धनादेश बँकेत अपुऱ्या निधीअभावी न वटल्यामुळे हा खटला दाखल करण्यात आला होता. फिर्यादी कारखान्याच्या वतीने ड. प्रवीण योगीराज मेटे यांनी केलेला प्रभावी युक्तिवाद आणि सादर केलेले भक्कम पुरावे ग्राह्य धरून दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर क्रमांक ३ यांनी हा दंड आणि कारावासाचा आदेश दिला आहे. प्रकरणाची सविस्तर पार्श्वभूमी अशी की, सन २०१०-११ च्या गळीत हंगामासाठी मैंदवाडी तांडा (ता. परळी, जि. बीड) येथील आरोपी प्रकाश भीमराव पवार याने अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्यासोबत ऊस तोडणी आणि पुरवठ्याचा करार केला होता. स्वतः वाहन मालक असल्याचे सांगून आरोपीने कारखान्याकडून ३ लाख रुपये उचल म्हणून घेतले होते. करारानुसार संपूर्ण हंगाम ऊस पुरवठा करणे बंधनकारक असतानाही आरोपीने मध्येच काम बंद केले. कारखान्याने वारंवार मागणी ▶▶ पान २ वर

## लाचेची मागणी करणारा

# पोलीस कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात लाचखोरी काही केल्या कमी होत नसल्याचे दिसत आहे. सिरसाळा पोलीस ठाण्यात कार्यरत असलेला पोलीस कॉन्स्टेबल दत्ता नागनाथ निघुल याला दोन हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी बीड येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराचा उसाने भरलेला ट्रॅक्टर काही शेतकऱ्यांनी शेतातून बाहेर जाऊ दिला नव्हता. याबाबत तक्रारदाराने सिरसाळा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती. त्यानंतर कॉन्स्टेबल दत्ता निघुल याने ट्रॅक्टर बाहेर काढून देण्यासाठी मदत केली. मात्र, ही मदत केल्यानंतर चहापाणीच्या नावाखाली दोन हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. या प्रकरणाची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करण्यात आल्यानंतर सापळा रचण्यात आला. त्यानुसार दत्ता निघुल याला सिरसाळा येथील मुख्यालयातून ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई बीड एसीबीचे उपअधीक्षक सोपान चिटमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार प्रदीप सुरवसे, बिडकर, काळे तसेच चालक म्हेत्रे यांनी ▶▶ पान २ वर

# मकोकातील फरार आरोपीसह दोन अट्टल साखळी चोर जेरबंद

**परळी । प्रतिनिधी**

जिल्हा पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेने परळी येथील इराणी वस्तीमध्ये धाडसी कोम्बिंग ऑपरेशन राबवून दोन सराईत गुन्हेगारांना बेड्या ठोकल्या आहेत. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये ठाणे जिल्ह्यातील 'मकोका' (मोक्का) कायद्यांतर्गत फरार असलेल्या एका अट्टल गुन्हेगाराचा समावेश आहे. या यशस्वी कारवाईत पोलिसांनी ३ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला असून, यामुळे जिल्ह्यातील साखळी चोरीचे तीन प्रमुख गुन्हे उघडकीस आले आहेत. धारूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या साखळी चोरीच्या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा करत होती. तांत्रिक विश्लेषण आणि ▶▶ पान २ वर



# झोका खेळताना चिमुकलीचा गळफास लागून अंत

**माजलगाव । प्रतिनिधी**

एका निष्पाप मुलीच्या खेळण्या-बागडण्याच्या वयात गळफास लागून अंत झाला. ही मन हेलावून टाकणारी घटना मंगळवारी शहरात घडली.मृत मुलीचे नाव वृंदा समीर रुद्रवार (वय ९) असे आहे. चिमुरडी इयत्ता दुसरीच्या वर्गात शिक्षण घेत होती. माजलगावचे व्यापारी प्रदीप रुद्रवारचे खंडोबा मैदान परिसरात निवासस्थान आहे. ३१ मार्च २०२६ रोजी महावीर जयंतीनिमित्त शाळेला सुट्टी होती, नऊ वर्षांची वृंदा आपल्या धाकट्या बहिणीसोबत घराच्या वरच्या मजल्यावर खेळत होती. झोका खेळण्यासाठी ती झोक्यावर चढण्याचा प्रयत्न करत होते, पण त्याचदरम्यान तिने एका खुर्चीचा आधार घेतला. अशातच अचानकपणे खुर्ची निसटली आणि दुर्दैवाने झोक्याचा दोर वृंदाच्या गळ्याला आवळला गेला. बराच वेळ झालं वृंदा जेवणासाठी खाली आली नाही, हेच बघण्यासाठी आई वरच्या मजल्यावर गेली. वृंदाच्या गळ्याला फास बघून तिच्या पायाखालची जमीन सरकली, तसेच आईनं किंकाळी फोडली. तिच्या आर्त किंकाळ्या ऐकून वृंदाचे आजोबा, वडील आणि कुटुंबातील इतर सदस्यांना तात्काळपणे वरच्या मजल्यावर धावले. नंतर वृंदाला रुग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.



# लिंबागणेश परिसरात रानडुकरांचा उपद्रव

## पिकांचे मोठे नुकसान, नुकसानभरपाईची मागणी

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील लिंबागणेश भागात सध्या रानडुकरांच्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. उन्हाळ्यामुळे पाण्याचे स्त्रोत आटल्याने अन्नाच्या शोधात रानडुकरे व इतर भटकी जनावरे थेट शेतात घुसून उभी पिके जमीनदोस्त करत आहेत. खाण्यापेक्षा पिकांची नासाडीच अधिक होत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर वनविभागाने तात्काळ पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

✻ रात्री पाणी देताना जीव धोक्यात - रामदास मुळे (नुकसानग्रस्त शेतकरी) : सध्या दिवसा वीज उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना रात्री पिकांना पाणी द्यावे लागते. यावेळी रानडुकरे अंगावर येण्याचा धोका निर्माण होत असून शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. काबाडकष्टाने उभे केलेले बाजरी, ज्वारी, मका यांसारखे पिक रानडुकरांकडून पूर्णपणे उद्ध्वस्त होत आहे. तलाठी यांना माहिती दिल्यावर फोटो पाठवण्यास सांगितले जाते; मात्र साधा मोबाईल असल्याने ते शक्य होत नाही, असे नुकसानग्रस्त शेतकरी रामदास मुळे यांनी सांगितले. तसेच तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी व रानडुकरांचा बंदोबस्त करावा, अशी त्यांनी मागणी केली.

✻ सौर कुंपण योजना सर्व गावांना लागू करावी - डॉ. गणेश ढवळे : डॉ. श्यामाप्रसाद जन-वन-विकास योजनेअंतर्गत ▶▶ पान २ वर



## संपादकीय

# पीएनजी जोडण्यांवर भर

आखाती देशातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रासह देशात एलपीजी गॅसचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला आहे. त्यातच राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या एका वक्तव्यामुळे सर्वसामान्यांची चिंता वाढली आहे. तीन महिन्यांनंतर कदाचित एलपीजी गॅसचा पुरवठा बंद होऊ शकतो असे भुजबळ म्हणाले. शनिवारी दिल्ली येथे आयोजित केंद्र सरकारच्या बैठकीनंतर ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी भुजबळ यांनी एलपीजी गॅसचा पुरवठा बंद करण्याबाबत केंद्र सरकारच्या पत्रकाचा उल्लेख करत राज्यातील पीएनजी गॅसच्या जोडण्या वाढवण्याची गरज व्यक्त केली. देशातील निवासी आणि व्यावसायिक आस्थापनांना एलपीजी गॅसचा पुरवठा सुलभपणे कसा करता येईल, त्यात कोणत्या अडचणी आहेत, याचा आढावा घेण्यासाठी दिल्लीत सर्व राज्यांच्या सचिवांना आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांना बोलावण्यात आले होते. या बैठकीला केंद्रीय मंत्री मनोहरलाल खट्टर, पेट्रोलियम मंत्री हरदीप पुरी, केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी उपस्थित होते. प्रत्येक राज्याचे मंत्री आणि सचिवांनी या बैठकीत काही सूचना केल्या. भुजबळ म्हणाले, आम्ही केंद्र सरकारला सांगितले की, पीएनजी गॅस सध्या स्वस्त पडत आहे. त्याचा जास्तीत जास्त उपयोग झाला पाहिजे. केंद्र सरकारच्या एका पत्रकात तीन महिन्यांनी कदाचित एलपीजी बंद होईल, असा उल्लेख होता. त्यामुळे आपण पीएनजीच्या जास्तीत जास्त जोडण्या करून घेतल्या पाहिजेत. जिथे जिथे या संदर्भात काम करणे शक्य आहे तिथे सुरू केले पाहिजे. सगळ्या नगरपालिकांनी पीएनजीच्या जोडण्या वाढवल्या पाहिजेत. पाण्याचे आणि विजेचे कनेक्शन असल्यावरच इमारतींना ओसी दिला जातो, त्याप्रमाणेच आता पीएनजी कनेक्शनच्या सक्तीची अट टाकली पाहिजे. पीएनजी जोडण्या लवकर करायच्या आहेत. पाईपलाईन टाकण्यासाठी विविध भागात परवानग्या मागितल्या जातात. या परवानग्या २४ तासांत दिल्या जातील. पीएनजीचे काम करणा–यांना २४ तास परवानगी राहील असेही भुजबळ म्हणाले. दुसरीकडे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात, देशात पुरेसा इंधन साठा आहे, अफवा पसरवाल तर तात्काळ फौजदारी कारवाई केली जाईल. मग दोन मंत्र्यांच्या वक्तव्यात विरोधाभास कसा असा प्रश्न सर्वसामान्यांना पडतो. देशात पेट्रोल–डिझेलचा तुटवडा आणि लॉकडाऊन लागण्याच्या अफवांना केंद्र सरकारने शुक्रवारी पूर्णविराम दिला. देशात कोणत्याही प्रकारचे लॉकडाऊन लागू केले जाणार नाही. तसेच इंधनाचा अजिबात तुटवडा नाही. त्यामुळे जनतेने घाबरून जाण्याचे कारण नाही, असे स्पष्ट करत केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी राज्यांना साठेबाजी रोखत इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्याचे आवाहन केले. त्याचबरोबर पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात केलेल्या कपातीच्या धाडसी निर्णयाबद्दल त्यांनी पंतप्रधान मोदींचे तोंडभरून अभिनंदन केले. अशाच प्रकारचे अभिनंदन मुख्यमंत्री फडणवीस यांनीही केले आहे. पेट्रोल–डिझेलवरील उत्पादन शुल्क कमी केल्याबद्दल त्यांनी पंतप्रधानांचे आभार मानले आहेत. इंधनाचा तुटवडा अजिबात नाही असा सरकारचा दावा आहे. अफवा पसरवून जर कुणी गोंधळाची स्थिती निर्माण करत असेल तर ते देशविरोधी काम आहे असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, आपल्या देशाच्या डिप्लोमॅटिक रिलेशनशीपमुळे, पंतप्रधानांच्या नीतीमुळे इंधनाचा तुटवडा निर्माण होणार नाही याची काळजी घेतली जात आहे. शहरांमध्ये महानगरच्या माध्यमातून पीएनजी गॅस पोहोचवण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. त्यासंबंधी सरकारने एक आदेश काढला आहे. शहरांवरील एलपीजीचा लोड कमी करून पीएनजीवर भर दिला जाणार आहे. पीएनजीमुळे एलपीजीची भविष्यात समस्या किंवा अडचण येणार नाही. आजूबाजूच्या देशांत लॉकडाऊन सुरू असताना आपल्या देशात मात्र कोणताही नकारात्मक परिणाम झाला नाही. जरी तेलाच्या किमती वाढल्या असल्या तरी त्याचा परिणाम सामान्य ग्राहकांवर पडू दिला नाही. एलपीजी गॅसचा कुठेही तुटवडा नाही. मुख्यमंत्र्यांनी ठामपणे हे वक्तव्य केले असले तरी आपल्या राज्यापुरते बोलायचे झाल्यास अनेक ठिकाणी गॅस खरेदीसाठी एजन्सीबाहेर रांगा लागल्याचे चित्र दररोज दिसते. कदाचित सरकारच्या नजरेत ते येत नसावे! जागतिक आव्हानांचा सामना करण्यासाठी नागरिकांनी समर्पण आणि ऐक्याने काम करावे असे आवाहन पंतप्रधान मोदींनी केले आहे. 'विकसित भारता'चे ध्येय साध्य करण्यासाठी देशातील जनतेच्या सामूहिक प्रयत्नांची गरज आहे असे ते म्हणाले. युद्धग्रस्त प्रदेशातील कच्चे तेल आणि वायूवर भारत अवलंबून आहे. पण शेतकरी आणि कुटुंबावर याचा बोजा पडणार नाही याची खबरदारी सरकार घेत आहे. भारत सध्या जगातील नैसर्गिक वायूचा चौथा सर्वांत मोठा आयातदार देश आहे. मात्र, आखाती देशात सुरू असलेल्या युद्धामुळे भारताचा गॅस पुरवठा धोक्यात आला आहे. विशेषत: होर्मुझची सामुद्रधुनी युद्धामुळे विस्कळीत झाल्याने भारताच्या चिंतेत भर पडली आहे. भारताचा गॅस पुरवठा दोन मुख्य मार्गाने होतो. १) भारत आपल्या एकूण गरजेच्या निम्मा गॅस स्वत: उत्पादित करतो. यात पूर्व किनारपट्टीवरील कृष्णा–गोदावरी बेसिनचा मोठा वाटा आहे. याशिवाय आसाम, त्रिपुरा आणि मुंबई हाय येथूनही गॅस मिळवला जातो. ओएनजीसी व रिलायन्स यासारख्या कंपन्या प्रमुख उत्पादक आहेत. २) उर्वरित ५० टक्के गॅस हा कतार, अमेरिका, संयुक्त अरब अमिराती आणि ओमान या देशांकडून एलएनजी स्वरूपात जहाजाद्वारे आयात केला जातो. हा गॅस गुजरातमधील दाहेज, हाजीरा आणि महाराष्ट्रातील दाभोळ येथील टर्मिनल्सवर उतरवून पाईपद्वारे शहरात पाठवला जातो. सध्याच्या परिस्थितीत पाईप्ड गॅस (पीएनजी) पूर्णपणे बंद होण्याची शक्यता कमी आहे. शहरी गॅस वितरकांकडे साधारणपणे १५ ते ३० दिवसांचा राखीव साठा असतो. सरकार घरगुती वापराच्या पाईप्ड गॅसला सर्वोच्च प्राधान्य देते. जर तुटवडा निर्माण झाला, तर सर्वांत आधी सीएनजी गाड्यांच्या आणि खत कारखान्यांच्या पुरवठ्यात कपात केली जाईल. एलपीजीची स्थिती पाईप्ड गॅसपेक्षा अधिक नाजूक आहे.

# सीलबंद पाण्याच्या बाटल्या किती सुरक्षित?

एप्रिल महिना सुरूही झाला नसताना राज्याला उन्हाच्या तडाख्याने हवालदिल केले आहे. उन्हाळा आला कि आईस्क्रीम, कोल्ड्रिंक यांचा खप चार पटीने वाढतो. यासोबत सीलबंद पाण्याच्या बाटल्याही मोठ्या प्रमाणात विकल्या जातात. पूर्वी प्रवासाला निघताना सोबत पाण्याचे कंटेनर घेऊनच निघावे लागे आता मात्र जागोजागी, ट्रेनमध्ये, बसमध्ये बसल्या जागी सीलबंद पाण्याच्या बाटल्या १० आणि २० रुपयांत मिळू लागल्या आहेत. सीलबंद बाटल्यांची लोकांना इतकी सवय जडली आहे की बाहेर उपहारगृहात जेवताना किंवा काही अन्नपदार्थ खाताना उघड्यावरील विनामूल्य पाणी पिऊन पोटाला त्रास करून घेण्याऐवजी लोक २० रुपयांची एक लिटरची सीलबंद पाण्याची बाटली विकत घेणे पसंत करतात. आजमितीला केवळ शीतपेयाच्या दुकानांत किंवा उपहारगृहांतच नव्हे तर महामार्गाच्या ठिकाणी पानाच्या टपरीवर, फळांच्या आणि भाज्यांच्या दुकानांतूनही सीलबंद पाण्याच्या बाटल्या विकल्या जाऊ लागल्या आहेत. उन्हाने जीव कासावीस झालेला असताना या थंडगार सिंलबंद पाण्याचा एक घोट जरी घशाखाली उतरला तरी स्वर्गीय सुखाचा अनुभव येतो. सीलबंद पाण्याच्या वाढत्या मागणीमुळे सीलबंद पाणी विकणाऱ्या कंपन्याही गावोगावी तयार होऊ लागल्या आहेत. पारदर्शक प्लास्टिक बाटलीत पाणी भरून त्यावर सील असलेले बूच लावले आणि त्यावर कंपनीचे लेबल चिकटवले कि ती बाटली २० रुपयांना कोणीही विकत घेतात. ज्या बिस्लेरी कंपनीने या सीलबंद पाण्याची संकल्पना लोकांमध्ये रुजवली त्या बिस्लेरी पाण्याच्या बाटल्या आज पाहायला मिळणेही दुरापास्त झाले आहे. बिस्लेरी मागितल्यावर आज दुकानदाराकडून सीलबंद पाण्याची कोणत्याही कंपनीची बाटली हाती थोपवली जाते. या सर्वच कंपन्या शासनमान्य असतात का ? यांच्या पाण्याची गुणवत्ता शासनाच्या अन्न आणि औषध विभागाने



तपासलेली असते का ? यांच्याकडे त्याबाबतचे प्रमाणपत्र असते का ? एसटीने प्रवास करताना दर दोन गावांच्या नंतर वेगळ्या कंपनीची सीलबंद पाण्याची बाटली पाहायला मिळते. लांबच्या प्रवासात रेल्वे डब्यात पाण्याच्या बाटल्या विकणाऱ्यांकडेही अशाच वेगवेगळ्या कंपन्यांच्या पाण्याच्या बाटल्या दिसून येतात. यामध्ये भरले गेलेले पाणी शासनाने नेमून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार शुद्ध केलेले असते का ? सीलबंद २० लिटर पाण्याच्या कंटेनर बाबतही तीच परिस्थिती आहे. आजमितीला अनेक कंपन्या, आस्थापने आणि कार्यालये यांमध्ये कर्मचाऱ्यांना पिण्यासाठी शुद्ध पाण्याचे २० लिटरचे कंटेनर मागवले जातात. रिकामे झालेले कंटेनर वॉटर सप्लायर्स घेऊन जाऊन दुसऱ्या दिवशी त्याच कंटेनर्समध्ये पाणी भरून आणतात. ८० ते १०० रुपये प्रति कंटेनर दराने भरून आणलेले हे पाणी शुद्धीकरण प्रक्रिया करून आणलेले असते कि थेट नगरपालिकेच्या नळातून भरलेले असते याची खात्री कोण करतं ? पुन्हा पुन्हा वापर केला जाणाऱ्या या कंटेनर्सना काही वेळा खालून शेवाळे लागलेले पाहायला मिळते, हे कंटेनर्स किती वेळा वापर केल्यावर नष्ट करावेत याबाबत सीलबंद पाणी विकणाऱ्या आणि खरेदी करणाऱ्यांना माहिती असते का ? आज भ्रष्टाचार दिल्लीपासून गल्लीपर्यंत मुरला आहे. सीलबंद पाण्याच्या बाटल्या बनवणाऱ्या कंपन्या याबाबतीत मागे राहतील का ? ग्राहकांकडून घेतलेल्या पैशांच्या मोबदल्यात त्यांना दिले जाणारे पाणी शुद्ध नसेल, तर ती केवळ ग्राहकाची फसवणूकच नव्हे, तर ग्राहकाच्या आरोग्यालाही अपायकारक ठरू शकते. सध्याच्या उन्हाळ्याच्या दिवसांत तहान लागल्यावर आपण जवळपास कुठे थंड पाण्याची बाटली विकत मिळते का ते शोधू लागतो. मिळाल्यावर ती कुठल्या कंपनीची आहे, त्या बाटलीवरील लेबलवर ट्रेडमार्क आहे का ? बाटलीवर एक्सपायरी डेट लिहिलेली आहे का ? लिहिली असल्यास ती उलटून तर गेली नाही ना ? पाणी विकणारी कंपनी शासनमान्य आहे का याबाबत कोणतीही खात्री न करता आपण तिचे बूच उघडून ती तोंडाला लावतो, हे आपण जागरूक ग्राहक नसल्याचेच लक्षण आहे. आरोग्य राखण्यासाठी घेतलेली पाण्याची बाटली आरोग्य बिघडवणारी ठरू नये यासाठी प्रत्येकाने सतर्क राहायला हवे. दिवाळी जवळ आली कि शासनाच्या अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे अधिकारी ठिकठिकाणी मिठाईच्या उत्पादकांवर धाडी मारून माव्याची तपासणी करतात. नकली मावा तयार करणाऱ्यांवर कारवाई करतात अशाच प्रकारची तपासणी उन्हाळयाच्या दिवसांत सीलबंद पाणी विकणाऱ्या कंपन्यांच्या कारखान्यांमध्येही करायला हवी !

# सीटीईटी परीक्षेत यश; झुंजार क्रिकेट संघाकडून शिक्षकांचा सन्मान

**गेवराई ।** प्रतिनिधी

झुंजार क्रिकेट संघाचे अष्टपैलू खेळाडू तसेच जिल्हा परिषदेत शिक्षक म्हणून कार्यरत असलेले शामलाल नवले सर, प्रशांत मस्के सर आणि अमोल आतकरे सर यांनी केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण होत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या या यशाबद्दल झुंजार क्रिकेट संघाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला असून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी संघातील सर्व सदस्यांनी या तिघा शिक्षक–खेळाडूंवर कौतुकाचा वर्षाव केला. मैदानावर उत्कृष्ट कामगिरी करणारे हे तिघेही शिक्षक शिक्षण क्षेत्रातही उत्तम यश संपादन करत असल्याचा अभिमान संघातील सदस्यांनी व्यक्त केला. शामलाल नवले सर हे गेवराई तालुक्यातील लुखामसला येथील जिल्हा परिषद शाळेत, प्रशांत मस्के सर हे तलवाडा केंद्रातील विठ्ठल नगर येथील जिल्हा परिषद शाळेत तर अमोल आतकरे सर हे पेंडगाव येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना घडवतानाच शिक्षण क्षेत्रातील स्पर्धात्मक परीक्षेतही त्यांनी यश संपादन केले असून त्यांच्या या यशाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



## पान १ वरून

### तुकाराम मुंढेंची...

✻ तुकाराम मुढेंकडं हे महत्वाचे विभाग सोपवले : तुकाराम मुंढे यांची बदली झाली असून त्यांच्याकडं आता मंत्रालयात आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल आणि वन विभाग ही तीन खाती सोपवण्यात आली असून या विभागाचे सचिव म्हणून ते काम पाहणार आहे. यापूर्वी दिव्यांग मंत्रालयाचे सचिव म्हणून काम करत असताना त्यांनी या मंत्रालयातील अनेक गैरप्रकार बाहेर काढले होते, त्यामुळं या विभागाला एकप्रकारे शिस्त लावण्याचं काम त्यांनी केलं होतं. ✻ कुठे केलीत कामं? : आत्तापर्यंत त्यांनी जिल्हाधिकारी (सोलापूर, जालना), नवी मुंबई/नाशिक महानगरपालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका वाहतूक महामंडळ (झचझचड) उचऊ विकास आयुक्त (असंघटित कामगार), कृषी विभाग सचिव इत्यादी पदांवर काम केले आहे. दुष्काळग्रस्त भागात आणि शहर प्रशासनात चांगले काम केल्याबद्दल ते प्रसिद्ध आहेत.

### एक वर्ष कारावास...

केल्यानंतर, आरोपीने २० फेब्रुवारी २०१८ रोजी व्याजासह एकूण ४ लाख ५४ हजार ७१७ रुपयांचा धनादेश कारखान्याला सुपूर्द केला होता. मात्र, हा धनादेश बँकेत जमा केला असता आरोपीच्या खात्यावर पुरेशी रक्कम नसल्याने तो अनादरित झाला. या फसवणुकीप्रकरणी कारखान्याने कायदेशीर नोटीस बजावूनही आरोपीने थकीत रक्कम भरली नाही, त्यामुळे कारखान्याने न्यायालयात धाव घेतली. या खटल्याच्या सुनावणीदरम्यान फिर्यादी कारखान्याच्या वतीने गोवर्धन पवार आणि लालासाहेब इंगळे या दोन साक्षीदारांच्या साक्षी नोंदवण्यात आल्या. ड. प्रवीण योगीराज मेटे यांनी तांत्रिक कायदेशीर बाबी आणि साक्षीदारांचा पुरावा न्यायालयासमोर अत्यंत चपखलपणे मांडला. जर आरोपीने ८ लाख १० हजार रुपयांचा दंड विहित मुदतीत भरला नाही, तर त्याला अधिकचा तीन महिने साधा कारावास भोगावा लागणार असल्याचेही न्यायालयाने निकालात स्पष्ट केले आहे. या निकालामुळे साखर कारखान्यांची उचल घेऊन फसवणूक करणाऱ्या टोळ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

### पोलीस कर्मचारी...

केली. दरम्यान, या प्रकरणी सिरसाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास सुरू आहे.

### मकोकातील फरार...

सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे हे आरोपी परळीतील इराणी वस्तीत वास्तव्यास असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष नियोजन करून २८ मार्च रोजी पहाटेच्या सुमारास तीन पथकांनी इराणी वस्तीत छापा टाकला. रात्रभर पाळत ठेवल्यानंतर पोलिसांनी कंबर ऊर्फ डंबर शहाजहान इराणी आणि हसनैन बरकतअली मिर्झा बेग ऊर्फ इराणी या दोघांना ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच आरोपींनी धारूर, आष्टी आणि बीडमधील शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत साखळी चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. तपासादरम्यान आरोपी हसनैन बेग हा ठाणे जिल्ह्यातील एका गंभीर मकोका गुन्ह्यात पोलिसांना हवा होता, अशी माहिती समोर आली आहे. या दोन्ही आरोपींना पुढील तपासासाठी धारूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, त्यांच्याकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या मोहिमेत गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, धनंजय ढोणे आणि त्यांच्या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली.

### लिंबागणेश परिसरात...

सध्या फक्त जंगलालगतच्या गावांना सौर कुंपणाचा लाभ दिला जातो. मात्र रानडुकरे, मोर, हरिण यांसारख्या वन्यजीवांचा त्रास अनेक गावांमध्ये होत असल्याने ही योजना सर्व गावांमध्ये सरसकट लागू करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केली आहे.






Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

प्रभू श्रीरामांच्या तत्त्वावर पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाचा कारभार :नवनाथ बन

सरकारचे योजना सर्वसामान्यापर्यंत पोहचवणे ही आपली जबाबदारी: आ.सुरेश धस

# आष्टी व कडा मंडळाच्यावतीने पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान मोठ्या उत्साहात संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**

कडा येथे आष्टी व कडा मंडळाच्या वतीने आयोजित 'पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६' या महत्त्वपूर्ण उपक्रमाचा सांगता समारंभ उत्साहात पार पडला. या वेळी भाजपचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते तथा मुंबई महानगरपालिकेचे सदस्य नवनाथ बन यांनी प्रमुख मार्गदर्शन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा गौरव करत, प्रभू श्रीरामचंद्रांच्या तत्त्वांवर आधारित शासनपद्धती देशात राबवली जात असल्याचे प्रतिपादन केले. नवनाथ बन आपल्या विस्तृत भाषणात म्हणाले की, प्रभू श्रीरामचंद्र हे राजघराण्यात जन्मले तरी त्यांनी जनतेच्या कल्याणासाठी वनवास स्वीकारला आणि त्या कठीण परिस्थितीतही त्यांनी आदर्श, कर्तव्यनिष्ठा आणि संयम यांचे पालन केले. त्यामुळेच त्यांना 'मर्यादा पुरुषोत्तम' ही उपाधी प्राप्त झाली. त्याचप्रमाणे भारतीय जनता पार्टी नेही अनेक वर्षे सत्तेबाहेर राहून संघर्षाचा काळ अनुभवला. या 'वनवासातून' बाहेर पडलेले प्रभावी नेतृत्व म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी असून त्यांनी देशाला स्थैर्य, विकास आणि सुरक्षिततेची नवी दिशा दिली आहे.

ते पुढे म्हणाले की, भारतीय जनता पार्टीच्या विचारांची पायाभरणी करताना अनेक पिढ्यांनी त्याग केला. अटल बिहारी वाजपेयी, लाल कृष्ण अडवाणी,मुरली मनोहर जोशी,



यांसारख्या ज्येष्ठ नेत्यांनी पक्षाची विचारधारा देशभर पोहोचवली. आज त्याच विचारांच्या बळावर पक्ष देशातील सर्वात मोठा राजकीय पक्ष बनला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने जागतिक स्तरावर आपले स्थान अधिक बळकट केले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची प्रतिमा उंचावली असून अनेक देश भारताकडे आदराने पाहत आहेत. गरीब, वंचित, शोषित, दलित व आदिवासी घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध योजना राबवण्यात आल्या आहेत. घरकुल, आरोग्यसेवा, पायाभूत सुविधा, डिजिटल सेवा या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली असून सामान्य नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडत आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रातील राजकारणावर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विकासकामांना वेग आला असून जनतेने त्यांना पुन्हा एकदा संधी दिली आहे. कार्यकर्त्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या योजना तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी अधिक सक्रिय राहण्याचे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश धस होते. तसेच व्यासपीठावर भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश सोशल मीडिया सेलचे प्रदेशाध्यक्ष प्रकाशजी गाडे, भाजप सोशल मीडिया सेल प्रदेश कार्यकारिणी सदस्य दत्ताजी महाजन, हिंदुत्ववादी कार्यकर्ते व ज्येष्ठ इतिहास अभ्यासक पवन मोगरेकर, आष्टी विधानसभा प्रमुख गणेश नाना शिंदे, सामाजिक कार्यकर्ते माऊली जरांगे, कडा मंडळ अध्यक्ष अनिल ढोबळे, आष्टी मंडळ अध्यक्ष रमेश गावडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय समारोपात आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, २०१४ ते २०१९ या काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या विकासकामांमुळेच जनतेने युतीला मोठा पाठिंबा दिला होता. त्यांच्या कार्याची हीच खरी पावती होती. मात्र त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी वेगळी राजकीय भूमिका घेतल्यामुळे परिस्थिती बदलली. तरीही देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षात राहूनही आपले नेतृत्व सिद्ध केले आणि 'मी पुन्हा येईन' या शब्दाला खरे ठरवत पुन्हा सत्तेत येऊन कामगिरी केली.सरकारने देखील अनेक योजना राबविल्या असून सरकारचे योजना सर्वसामान्यापर्यत पोहचवणे ही आपली जबाबदारी असल्याचे प्रतिपादन आ.सुरेश धस असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित कार्यकर्त्यांचा उत्साह, शिस्तबद्धता आणि संघटनाबद्दलची निष्ठा विशेषत्वाने जाणवली. या सहा दिवसीय प्रशिक्षण महाअभियानात तालुक्यातील पदाधिकारी, बूथप्रमुख, शक्तिकेंद्रप्रमुख, महिला पदाधिकारी, युवा कार्यकर्ते आणि विविध आघाड्यांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. शेवटी आयोजकांच्या वतीने सर्व मान्यवरांचे आभार मानण्यात आले आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## महावीर जयंतीनिमित्त अरिहंत जैन सेवाभावी संस्था, दिगंबर जैन मंदिर व आनंदऋषी नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिर संपन्न





**परळी वै. । प्रतिनिधी**

महावीर जन्म कल्याणक निमित्त अरिहंत जैन सेवाभावी संस्था, दिगंबर जैन मंदिर व आनंदऋषी नेत्रालय अहिल्यनगर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाला. मोफत नेत्र तपासणी शिबिरात २२० रूग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली.

परळीतील गणेशपार भागातील जैन मंदिर सभागृहात सोमवार दि.३० मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्धाटन परळी नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रतिष्ठीत व्यापारी शांतीलालजी जैन, विजयजी वाकेकर, धरमचंदजी बडेरा, ओमप्रकाशजी मुळुजकर, प्रकाशचंद कांकरिया, सौ.लता तातेड, सौ. मधुबाला कांकरिया आदींची प्रमुख उपस्थिती लाभली. या शिबिरात नेत्रतज्ञ गणेश तवळे यांनी रूग्णांची तपासणी केली. त्यांना कुंदन शिंदे, अरूण वाघमारे, गणेश घोलप आदींनी सहकार्य केले. शिबिराचे वैशिष्ट्ये म्हणजे ६ महिन्याच्या बाळाची देखील नेत्र तपासणी करण्यात आली. या शिबिराला सकल जैन समाज बांधवांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

शिबिर यशस्वी करण्यासाठी अरिहंत जैन सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रितम बोरा, सचिव धिरज बडेरा यांच्याह त्यांचे सर्व पदाधिकारी तसेच महावीर संघई, महावीर महालिंग, मयूर मुळजकर, नेमिचंद कुरकूट, रमेश संघई, धीरज दुरुगकर, अमोल संघई, वैभव कुरकुट, कुलभूषण कटके आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन मयूर मुळजकर यांनी केले.

## स्व.सरस्वतीबाई बलभीमराव जाहेर पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली ; राजर्षी शाहू कन्या विद्यालयात शोकसभा

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय तसेच उद्योग, व्यवसाय आणि शेती क्षेत्रातील सर्वपरिचित व्यक्तिमत्व तसेच श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळाचे अध्यक्ष श्री. बलभीमराव दादा जाहेर पाटील यांच्या सौभाग्यवती, तसेच बीड शहराचे पाटील स्व. गिन्यानदेवराव पाटील यांची कन्या व स्व. दिनकर अण्णा गिराम पाटील यांच्या भगिनी स्व. सरस्वतीबाई बलभीमराव जाहेर पाटील यांचे नुकतेच दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने एक प्रेमळ, कर्तव्यदक्ष व सन्माननीय व्यक्तिमत्व हरपले आहे. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ राजर्षी शाहू कन्या विद्यालय, तेलगाव रोड, बीड येथे शोकसभेचे आयोजन करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या शोकसभेस संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. बी.आर. पंडित, संस्थेचे सचिव प्रा. जे. पी. शेळके, संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा. ए.आर. पाटील, राजर्षी शाहू कन्या माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती एस. डी. कदम, त्रिविक्रमेश्वर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती एस. आर. जोगदंड, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. आर. टी. राऊत तसेच राजमाता इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या श्रीमती आर.डी. लोखंडे या उपस्थित होत्या. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष तसेच सर्व मान्यवर, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी स्व. सरस्वतीताई जाहेर पाटील यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून, त्यानंतर भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. प्रा. जे. पी. शेळके यांनी आपल्या मनोगतात स्व. सरस्वतीताई जाहेर





*श्रीराम जन्मोत्सवाच्या शुभ मुहूर्तावर दैनिक मराठवाडा पत्रचे वडवणी तालुका प्रतिनिधी संभाजी लांडे पा. यांनी बजाज चेतक ट्युव्हिलर गाडी घेतली असता या वेळी शुभेच्छा देण्यासाठी डोंगरचा राजाचे संपादक अनिल वाघमारे, पत्रकार सुभाष काका पोटभरे, पत्रकार सतीश सोनवणे, पत्रकार महेश सदरे, संचालक सौरभ खांडवे सर, शिवाजी कदम, दत्ता कदम, शहाजी कदम, अमोल कदम, शोरूम चे संचालक विनोद भुजबळ, किरण खराडे, गणेश लांडे, रवी लांडे, सुनील शिंदे, वैभव होंडे आदी उपस्थित होते.*

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळ सभा २९ मार्च २०२६ रोजी चंद्रभागा बाबुराव तुपे साधना कन्या विद्यालय, हडपसर, पुणे येथे संपन्न



**पुणे । प्रतिनिधी**

अध्यक्षस्थानी महामंडळाचे अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर कानडे होते. तर मंचावर महामंडळाचे सरचिटणीस तथा माजी आमदार श्री. व्ही. यू. डायगव्हाणे, नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर आडबाले, कोषाध्यक्ष श्री. ए. बी. औताडे, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष श्री अरविंद देशमुख, महाराष्ट्र माध्यमिक शिक्षक संघाचे सरचिटणीस श्री. एस. डी. भिरूड, मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष श्री. सूर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस श्री. राजकुमार कदम यांची उपस्थिती होती.

बैठकीत मराठवाड्यातील ज्वलंत प्रश्न तथा त्या अनुषंगाने झालेल्या आंदोलनाचा आढावा सादर केला. घटक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षक व शिक्षण वाचविण्यासाठी महामंडळाने व्यापक आंदोलने उभारण्याची गरज प्रतिपादन केली. महाराष्ट्र विधान परिषदेतील शिक्षकांचे शिक्षक असलेलेले एकमेव प्रतिनिधी आमदार सुधाकर आडबाले यांनी विधानपरिषदेतील कार्याचा आढावा सादर केला. नव्वदच्या दशकात राज्य*

*विधानपरिषदेत शिक्षक संघटनांचे सात आमदार होते त्यामुळे शिक्षकांचा बाहेरचा लढा सभागृहात प्रतिबिंबित होत होता मात्र आता मी संघटनेचा एकमेव प्रतिनिधी असल्याने कुणाची साथ मिळत नसल्याची खंत व्यक्त केली! सभेस श्री जगदीश जुनघरी,श्री श्रावण बरडे, प्राचार्या सौ. उर्मिला पाटील, राजेश धुर्वे, अजय लोंढे, महेंद्र सालंकार तसेच विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, मराठवाडा शिक्षक संघ व महाराष्ट्र माध्यमिक शिक्षक संघाचे पदाधिकारी उपस्थित होते. महामंडळाचे सहसचिव राजकुमार कदम यांनी सर्वांचे आभार मानले.

# नवसाला पावणारा मारोती हनुमान मंदिर जागृत देवस्थान येथे भव्यदिव्य सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज चाकरवाडीकर, श्री संत बंकटस्वामी महाराज बीडकर,श्री संत भीमसिंह बाबा,श्री मारोती महाराज दस्तापुरकर श्री संत भगवानबाबा भगवानगडकर श्री संत वामनभाऊ गहिनीनाथ गडकर,श्री संत नारायण बाबा वांगीकर, मृदंग महर्षी बाबुरावजी डवरी गुरूजी, गुरुवर्य आत्माराम बाबा पायतळवाडीकर व पद्मश्री शंकरबापु आपेगांवकर अशा अनेक महान साधुसंतांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या श्री मारुती हनुमान मंदिर देवस्थान ट्रस्ट श्री क्षेत्र बाभळगाव येथील अध्यक्ष ह.भ.प.श्री. शिवाजी महाराज डाके हनुमंत रायाची महती सांगत असताना

नवसाला पावणारा मारोती हनुमान मंदिर देवस्थान हाजारो वर्षांपासून प्रचलित आहे. लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. दर शनिवारी व अमावस्या ला प्रचंड भाविकांची गर्दी होत असते. त्यांमध्ये भावीक काही चालवत वारी करतात काही बैलगाडी ने भाविक येतात. किर्तन,भजन, अभिषेक , महाआरती असे अनेक कार्यक्रम चालु असतात. वर्षातुन दोन वेळा एक चैत्र



पौर्णिमा श्रीसंत ज्ञानेश्वर माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या पुण्यतिथी निमित्त व दुसरा म्हणजे श्रीराम नवमी ते हनुमान जन्मोत्सव भव्यदिव्य सोहळा अखंड हरिनाम सप्ताह किर्तन, संगीत भजन, जगद्गुरु संत तुकाराम महाराज गाथा भजन, ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, हरिपाठ,भारूड असे अनेक कार्यक्रम होत असतात.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध किर्तनकार व गायक मंडळी, म्रदंग सम्राट मंडळी आठ दिवस राहुन आपली सेवा सादर करतात.

विशेष म्हणजे श्री संत ज्ञानेश्वर माऊली महाराज चाकरवाडीकर यांना नवसाला पावणारे मारोती हनुमानजी प्रसन्न होते. माऊली महाराज हे हनुमानजी ची श्री क्षेत्र बाभळगाव येथे सेवा करत नित्यनेमाने ध्यान धारणा पुजा करत असत, ज्ञानेश्वर माऊली महाराज चाकरवाडीकर यांची खुप इच्छा होती कि माझी समाधी श्री मारूती मंदिर देवस्थान शेजारीच व्हावी,पण काही कारणास्तव होऊ शकली नाही पण माऊली चे खरे श्रद्धास्थान आहे. श्री क्षेत्र बाभळगावकर सर्व ग्रामस्थांनी मिळुन ठरवले माऊलीची समाधी व भव्यदिव्य स्वरूपात मंदिर तयार केले.

तिथे मुर्ती माऊली ची म्हणजे साक्षात माऊली महाराज बसले आहेत.येवढी छान मुर्ती बसवली आहे. तिच परंपरा आज पण जोमाने चालू आहे.

**हाजारो वर्षांपासून परमपंरा आहे जेवढया गावातील मुली लग्न होऊन सासरी गेल्या आहेत त्यासर्वच मुली एक वेळ दिवाळीला येणार नाहीत पण हनुमान जन्मोत्सवला नक्की येतात. शेवटच्या दिवशी हनुमान जन्मोत्सव,काल्याचे किर्तन, गाड्या ओढण्याचे कार्यक्रम,शेरनी व महाराष्ट्रातील सर्वच भाविकांना अन्नदान महाप्रसादाचे वाटप केले जाते. –ह.भ.प.श्री शिवाजी महाराज डाके श्री मारुती हनुमान मंदिर देवस्थान ट्रस्ट श्री क्षेत्र बाभळगाव ता. माजलगाव जिल्हा बीड.**

हाजारो भाविक भक्त येत असतात कुणाला मुल बाळ होत नाही, कुणाला रोग झाला आहे. असे कितीतरी व्यक्ती बरे झालेत. नौकरी लागुदे, आजार बरा होऊदे,लग्न होऊदे,गायक वादक किर्तनकार होऊदे असे हाजारो लोक बंजरंगबली यांना नवस व साकड घालत असतात तुम्हाला सोन करील, भाविकांना साखर वाटेल,गुळ वाटेल असे अनेक नवस भाविक करत असतात सर्वांची मनोकामना हनुमानजी प्रसन्न होतात व इच्छा पुर्ण करतात.

श्री क्षेत्र बाभळगाव गावातील व्यकतींचे तर असे अनुभव आहेत. कितीही हाजारो कोस दुर असेल किती पण मोठे संकट येवो फक्त मारोती हनुमानजी चे चिंतन पण केलेतरी सर्व एक मिनीटात गायब होते. एक सध्या चा किस्सा आहे कोरोणा मध्ये करोडो लोक आपल्यातुन निघुन गेले. पण माझ्या हनुमान जीच्या श्री क्षेत्र बाभळगावातील एका व्यक्तीला पण कोरोणा झाला नाही .हिच खरी हनुमान जी बंजरंगबली ची ताकत आहे. जुने गावाती जेष्ठ मंडळी एक किस्सा सांगत होते कि एक ड्रायव्हर शाळेची बस घेऊन मुल- मुलींना घेऊन जाण्यासाठी आला असताना. कंनडाक्टरने सांगीतले आज अमावस्या आहे आपण दर्शन घेऊन येऊया तर तो ड्रायव्हर बोलला मी देव काही मानत नाही तुच जा तुला जायचे तर कंनडाक्टर दर्शनासाठी निघुन गेला.

दर्शनाहुन वापस येऊन पहातो तर काय ड्रायव्हर चे तोंड वाकडे झालेले. सरळ काही होईना तर त्याला उचलुन हनुमान मंदीरात घेऊन जाण्यात आले.

तर त्याची चुक त्याला कळली तर त्याने नवस बोलला मी इथुन पुढे पन्नास वारी करील हनुमान बंजरंगबली यांनी वाकडे तोंड झालेले सरळ केले.

एक व्यक्ती तर शुक्रवारी रात्री नॉनव्हेज खाले व शनिवारी तो अभिषेक,पाणी घालण्यासाठी मंदिरात आला तर आत मध्ये तर गेलाच नाही लांबच तो बाहेर घंटी वाजवण्यासाठी उडी मारली तर तो तसाच घंटी ला चिकटुन बसला. तर त्यांची चुक मान्य करून पुन्हा असे होणार नाही व पुर्ण मंदीराला कलर देईल नवस बोलला.

अजुन एक सद्गृहस्थाने असेच कृत्य केले तर त्यांच्या डोक्यात बंजरंगबली हनुमानजीनी लाकडी फळी डोक्यात उचकुन लागली. तर त्यांने सागींतले मी रोज नित्य नियमाने हनुमान चालीसा वाचेल व चुकीचे खाने बंद करेल,असे हाजारो भावीकांचे नवस पूर्ण होतात. कुणाला साप चावला तर डॉक्टर कडे नेण्याची काही गरज पडत नाही मंदिरात बंजरंगबली च्या समोर नेऊन अंगोरा लावला कि व्यक्ती पहिल्या सारखा ठणठणीत होतो.गेली तिन चार वर्षे झाली भव्यदिव्य स्वरूपात बैलगाडा शर्यत गावातील तरूण मंडळी करतात. महाराष्ट्रातील अनेक बैलगाडा मालक सहभागी होतात. लाखो रुपयेचे बक्षीस ठेवले जातात.त्यामध्ये सामाजिक कार्यकर्ते, राजकिय नेते, धार्मिक मंडळी सर्वांचाच समावेश असतो.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • बुधवार दि. ०१ एप्रिल २०२६ •

# बीड पोलिसांच्या 'आश्वासनांचे' श्राद्ध!

**■ पत्रकार आत्माराम वाव्हळ यांची दुचाकीनंतर आता मोबाईललाही 'भावपूर्ण श्रद्धांजली'**

**■ पोलिसांच्या हतबलतेवर सोशल मीडियातून सडकून टीका; १४-१५ वर्षांच्या कष्टाच्या कमाईवर चोरांचा डल्ला**

**बीड । प्रतिनिधी**

रक्षणकर्तेच जेव्हा हतबल ठरतात, तेव्हा सामान्यांनी कुणाकडे पाहायचे? असा संतप्त सवाल बीडमधील पत्रकार आत्माराम वाव्हळ यांच्या एका 'श्रद्धांजली' पोस्टरमुळे उपस्थित होत आहे. तब्बल १४-१५ वर्षे विनाअनुदानित शाळेत विना पगारी काम करून, एक-एक रुपया जमवून त्यांनी घेतलेली त्यांची ' हिरो होंडा स्प्लेंडर चक-२३ -ड ९२५५' या क्रमांकाची मोटारसायकल आणि गेल्या वर्षी २८ मार्च २०२५ रोजी 'ओप्पो ठशपे ८' कंपनीचा स्मार्टफोन चोरीला गेला होता. परवा त्या घटनेला एक वर्ष पूर्ण झाले, तरीही त्याचा तपास लागला नाही, तब्बल एक वर्षानंतर आता पोलिसांच्या तपासावर विसंबून न राहता वाव्हळ सरांनी चक्क आपल्या लाडक्या मोबाईलचे 'श्राद्ध' घालत सोशल मीडियावरून आपले दुःख आणि संताप व्यक्त केला आहे.

२०१७ पासून सुरु असलेला 'तक्रारींचा' प्रवास-बीड शहरातील पत्रकार आत्माराम वाव्हळ सरांनी अत्यंत कष्टाने घेतलेली ' हिरो होंडा स्प्लेंडर कंपनीची चक-२३ --ड-९२५५' या क्रमांकाची मोटारसायकल २०१७साली चोरीला गेली होती. यासंदर्भात त्यांनी बीड शहर पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली होती.




मात्र, अनेक वर्षे उलटूनही या चोरीचा तपास लावण्यात पोलिसांना सपशेल अपयश आले. अखेर, बरोबर एक वर्षांनी त्यांनी २०१८ मध्ये जड अंतःकरणाने आपल्या त्या लाडक्या दुचाकीचे 'श्राद्ध' घातले होते. ही घटना त्यावेळी संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरली होती.

आता 'शिवाजीनगर' पोलिसांच्या दप्तरीही फक्त कागदच!दुचाकीच्या चोरीनंतर सावरून आत्माराम वाव्हळ सरांनी पुन्हा कष्टाने पैसे जमवून नव्याने दुसरी मोटारसायकल खरेदी केली. दरम्यान आजच्या काळात स्मार्टफोन ही प्रत्येक नागरिकांची काळाची गरज निर्माण झाली आहे. शिवाय प्रत्येक पत्रकारांना बातम्यांच्या संदर्भात अपडेट राहण्यासाठी पत्रकारांकडे स्मार्टफोन असणे फार गरजेचे झाले आहे. त्यामुळे त्यांनी Oppo Reno 8 कंपनीचा काळ्या रंगाचा स्मार्टफोन खरेदी केला होता. मात्र, अवघ्या काही दिवसातच म्हणजेच दिनांक २८ मार्च २०२५ रोजी त्यांच्या या मोबाईलवरही चोरांनी डल्ला मारला. या चोरीची तक्रार त्यांनी शिवाजीनगर पोलीस स्टेशनमध्ये दाखल केली. पोलीस खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी वारंवार संपर्क साधून, विनंती करूनही तपास यंत्रणेने कोणतीही हालचाल केली नाही. वर्षभर पोलीस ठाण्याचे उंबरठे झिजवूनही काहीच साध्य झाले नाही.

वरिष्ठांकडे विनंती करूनही पदरी फक्त निराशाच-वारंवार पोलीस खात्यातील वरिष्ठांशी संपर्क साधला, मोबाईल आणि मोटरसायकलचा तपास लावण्याची विनंती केली, पण यंत्रणेने काहीच केले नाही. शेवटी हतबल होऊन मी हे पाऊल उचलले आहे, अशी भावना आत्माराम वाव्हळ यांनी व्यक्त केली आहे.

सोशल मीडियातून यंत्रणेच्या डोळ्यात अंजन-पुन्हा एकदा पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, आत्माराम वाव्हळ सरांनी या मोबाईललाही परवा दिनांक २८ मार्च २०२६ रोजी एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर 'भावपूर्ण श्रद्धांजली' वाहणारे पोस्टर सोशल मीडियात प्रसिद्ध केले आहे. अखेरचा ठावठिकाण: अज्ञात असे लिहित त्यांनी आपल्या मोबाईलशी अगदी एका निर्जीव वस्तूशी असलेला आपला जिव्हाळा आणि पोलीस यंत्रणेबद्दलची चीड व्यक्त केली आहे. एका पत्रकारालाच आपल्या चोरीला गेलेल्या वस्तूंच्या तपासासाठी असे 'श्राद्ध' घालावे लागत असेल, तर सामान्य नागरिकांचे काय? असा खडा सवाल आता बीडकर विचारत आहेत.

### ● मिश्किल प्रतिक्रियेचे कौतुक!

**पत्रकार आत्माराम वाव्हळ यांनी आपल्या हरवलेल्या वस्तूबाबत व्यक्त केलेली ही हळवी पण मिश्किल प्रतिक्रिया सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. मोबाईलमधील डेटा आणि कामाच्या आठवणी आता परत येणार नाहीत, याची जाणीव असल्याने त्यांनी ही अनोखी श्रद्धांजली वाहिली आहे. सोशल मीडियावर हे पोस्टर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत असून, अनेकांनी स्मार्टफोनची अशी एक्झिट पहिल्यांदाच पाहिली, अशा प्रतिक्रिया दिल्या आहेत.**

## थोडक्यात...

### ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांना मातृशोक



**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील होळ येथील संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा व्याकरणाचार्य ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांच्या मातोश्री नानीबाई शेषेराव लाड (वय ९९) यांचे वृद्धापकाळाने सोमवारी (दि.३०) सायंकाळी ८ वाजता लाडेवडगाव (ता.केज) येथील राहत्या घरी निधन झाले. मंगळवारी (दि.३१) लाडेवडगाव येथे त्यांच्या पार्थिवावर शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी वारकरी संप्रदायातील सद्गुरू जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संदीपान महाराज हासेगावकर, वेदांत साधनास्थली गुरुकुल आश्रमाचे मार्गदर्शक स्वामी ब्रह्मानंद महाराज, जगन्नाथ महाराज देशमुख, ज्ञानेश मिशन संस्थेचे अध्यक्ष रामकृष्ण महाराज कदम, अखिल भारतीय वारकरी महामंडळाचे अध्यक्ष आर.के.रांजणे, तुळशीराम कराड, विठ्ठल महाराज शास्त्री, किसन महाराज पवार, पांडुरंग महाराज मुंडे, भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.प्रल्हाद ढाकणे शास्त्री, रेखाताई गुट्टे, गोदावरीताई मुंडे, अयोध्याताई केंद्रे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते ऋषिकेश आडसकर, भाजपचे ज्येष्ठ नेते वसंत केदार, संतोष हांगे, विष्णू घुले, भाजप तालुकाध्यक्ष भगवान केदार, मधुकर आघाव, डॉ. नवनाथ घुगे यांच्यासह राजकीय, सामाजिक व वारकरी संप्रदायातील अनेक नागरिक उपस्थित होते. दरम्यान, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी भ्रमणध्वनीवरून लाड कुटुंबियांचे सांत्वन करून शोक व्यक्त केला. नानीबाई लाड यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

### मराठवाडा स्मॉल बिझनेस डेव्हलपमेंट फायनान्सच्या पदी विधी सल्लागार म्हणून निवड : अ‍ॅड. श्रीराज शेळके पाटील



**बीड । प्रतिनिधी**

मराठवाडा विभागातील लघुउद्योगांना चालना देण्यासाठी कार्यरत असलेल्या मराठवाडा स्मॉल बिझनेस डेव्हलपमेंट फायनान्स या संस्थेच्या विधी सल्लागार पदी अ‍ॅड. श्रीराज शेळके पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मराठवाडा स्मॉल बिझनेस डेव्हलपमेंट फायनान्स चे संचालक प्रा.शिवराज बांगर पाटील व श्री. विनोद बडे यांनी मंडळाच्या बैठकीत हा निर्णय एकमताने घेण्यात आला. अ‍ॅड. श्रीराज शेळके पाटील यांनी विविध कायदेशीर क्षेत्रात केलेले कार्य, तसेच त्यांचा अनुभव आणि अभ्यास पाहता त्यांची निवड करण्यात आल्याचे फायनान्स च्या वतीने सांगण्यात आले.या नियुक्तीमुळे फायनान्स च्या कार्यात कायदेशीर पारदर्शकता वाढण्यास मदत होणार असून, सदस्य उद्योजकांना करार, कर्ज व्यवहार, वादविवाद आणि इतर कायदेशीर बाबींमध्ये योग्य मार्गदर्शन मिळणार आहे.या नियुक्तीच ` सर्व स्तरांतून स्वागत करण्यात येत असून, उद्योग क्षेत्रात यामुळे सकारात्मक बदल घडण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# महादेव कसबे यांनी शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले: डॉ.योगेश क्षीरसागर

**कानडीघाट हायस्कूलचे मुख्याध्यापक महादेव कसबे यांचा सेवापूर्तीनिमित्त गौरव**

**बीड । प्रतिनिधी**

महादेव कसबे यांनी प्रदीर्घ व उल्लेखनीय सेवा बजावत शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या कार्यकाळात अनेक विद्यार्थी घडले असून त्यांनी समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे, असे मत नवगण शिक्षण संस्थेचे सचिव तथा भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केले.



बीड तालुक्यातील कानडीघाट येथील नवगण शिक्षण संस्था संचलित हायस्कूलचे मुख्याध्यापक महादेव कसबे यांच्या सेवापूर्तीनिमित्त मंगळवारी गौरव सोहळ्याचे आयोजन केले होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. यावेळी ह.भ.प. नामदेव महाराज कवडे, माजी पंचायत समिती सदस्य सुनिल झोडगे, सरपंच गोकुळ कुडके, विठ्ठल हांगे, अंबादास पवार, अशोक घुमरे, संतोष घुमरे, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, प्रशासक डॉ. व्ही.टी.देशमाने, डॉ.सुधाकर गुट्टे, मुख्याध्यापक लक्ष्मण चंदनशिव, दीपालीताई शेंडगे, शुभम कातांगळे, राजाभाऊ क्षीरसागर, प्रदीप अडागळे, इम्रान जागीरदार, पंकज शिंदे, लालासाहेब घुमरे आदींची उपस्थिती होती. दरम्यान, संस्थेच्यावतीने मान्यवरांच्या हस्ते कसबे दाम्पत्याचा सन्मान केले. यावेळी ग्रामस्थ, विद्यार्थी, पालक व शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सहकार खात्यामधून निवृत्त लेखापाल यांना नोकरीची संधी

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ व कलम ८८ अन्वये चौकशी/ प्राधिकृत अधिकारी यांची नामतालिका तयार करण्यासाठी सहकार खात्यातून निवृत्त झालेल्या अधिकारी (वयाची ७० वर्षे पूर्ण न झालेल्या), निवृत्त न्यायाधीश, वकिल, सनदी लेखापाल यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जाचे विहित नमूने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर विभाग लातूर, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, लातूर, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर धाराशिव / बोड / नांदेड व संबंधित जिल्ह्यातील सर्व उपनिबंधक व सहायक निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयात दि. ०१.०४.२०२६ ते दि. ३०.०५.२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळू शकतील व भरलेली परीपूर्ण अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह उक्त कालावधीत संबंधित कार्यालयात सादर करण्यात यावेत.

# पिंपळनेर ग्रामपंचायत येथे सत्कार संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

पिंपळनेर येथील गवळी शितल संजीवनी अवधूत (महाराष्ट्र पोलीस). नरवडे पांडुरंग, उषाबाई रामप्रसाद (महाराष्ट्र पोलीस), ऋषिकेश अशोक जाधव (इंडियन आर्मी, परभणी येथील विशाल गोदावरीअवधूत कवचट (महाराष्ट्र पोलीस), ईट येथील विकास कालिंदा दत्तात्रेय डोईफोडे (महाराष्ट्र पोलीस), पिंपळादेवी येथील



माऊली त्रिवेणी सखाराम कानाडे (महाराष्ट्र पोलीस). पिंपळनेर सर्कल मधील ग्रामीण भागातून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मेहनत जिद्द आणि चिकाटी च्या जोरावर हे यश या तरुणांनी मिळवले आहे त्यांच्या या अशा मागे त्यांच्या कुटुंबाचे वडिलांचे मोलाचे मार्गदर्शक आणि पाठबळ आहे हा संपूर्ण गावांसाठीच व पिंपळनेर सर्कल साठी अभिमानाची बाब आहे असे या प्रसंगी बोलतांना माजी जी. पं सदस्य मनोज जाधव पाटील यांनी म्हंटले, पिंपळनेर ग्रामपंचायत येथे सत्कार करण्यात आला यावेळी पिंपळनेर येथील नागरिक व ग्रामसेवक तलाठी व सर्व सदस्य व पिंपळनेर येथील सर्व सहकारी उपस्थित होते.



*बीड : दिनांक ३१ मार्च रोजी द्वितीय सत्र परीक्षेतील इयत्ता १ली ते ४ थीच्या गुणवंत विध्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण सोहळा कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राध्यापिका सौ. बबिता गायकवाड तसेच प्रमुख पाहुण्या मराठवाडा पत्र दैनिक च्या संपादिका सौ. ज्योती नरनाळे व तलाठी पदावर कार्यरत असलेल्या सौ सुरेखा साळुंके , बेसिक कोचिंग क्लासेसच्या संचालिका सौ. वैशाली वायभट व क्लासेसच्या सहशिक्षिका सौ. किरण जाधव , सौ. दीपाली जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाला.*



*पिंपळनेर सर्कल मधील मौजे केसापुरी परभणी येथे युवानेते भैरवनाथजी माने यांचा पुतण्या सोमनाथ व बाळासाहेबजी शिंदे यांची मुलगी व केसापुरी परभणी चे सरपंच महेशजी शिंदे यांची पुतणी क्रांती या नवदांपत्याच्या साखरपुडा समारंभास शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी उपस्थित राहून दोघांना पुढील जिवनास शुभेच्छा दिल्या. यावेळी सोबत युवानेते सतिष भाऊ इतापे, युवा नेते अजय भैय्या शिंदे,सनराईज इंग्लिश स्कूल चे संस्थापक अध्यक्ष रामेश्वर सातपुते सर, सुनील भाऊ वाघे, अशोक दादा कवचट,युवा नेते सचिनजी शिंदे,युवा नेते गोविंदजी शिंदे,सुनील सातपुते, श्रीकृष्ण शिंदे सह सर्व सहकारी व गावकरी उपस्थित होते..!*

# बीड येथील विवाहित तरुणास आत्महत्येस प्रवृत्त केल्या प्रकरणी सासरच्या चौघांना बीड पोलीसांनी ठोकल्या बेड्या

**तलवाडा । प्रतिनिधी**

बीड येथील पापनेश्वर मंदिर भागात गेल्या काही दिवसा पुर्वी एका विवाहित तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना ऊघडकिस आली होती. त्या घटनेस आणुसरुन मय्यत तरुणाचा भाऊ आवेद महेमुद शेख वय वर्षे ३५ रा. अलस्कानी पॅलेस सय्यदपुरा सुरत (गुजरात) याने बीड जिल्हा पोलीस अधीक्षकांना आर्ज देऊन आरोपीस अटक करण्याची मागणी केली होती. त्यात त्याने म्हटले होते की माझा भाऊ आदम महेमुद शेख यांचे सुहाना आदम



शेख यांच्या बरोबर १७ वर्षापुर्वी लग्न झाले होते. त्यास दोन मुली व एक मुलगा आहे. लग्नानंतर ते १० ते ११ यर्षे व्यवस्थित राहीले परंतु मागील ५ ते ६ वर्षापासुन त्याच्या पत्नीचे चारित्र्य वर्तण बिघडले होते. त्यास तो विरोध करत होता त्यामुळे त्याची पत्नी सुहाना, सासरे आबेद, सासु मुमताज, मेव्हणा आमेर व सुमेर आणि चुलत सासरा समीर रा. माजलगांव हे आदम यास मारहाण करत होते, व शिवीगाळ करत त्यास जेवायला न देणे तो आत्महत्येस प्रवृत्त होईल इथपर्यंत छळ करत होते. आठ दिवसापुर्वी चुलत सासरा समीर याने माजलगांव येथे गाडीने बोलावून घेवून जबर मारहान केली तसेच मागील ३४ दिवसापुवी त्याची बायको, सासु, सासरे, मेव्हणे यांना बीड येथे घरात घेवुन जबर मारहाण केली ते रोज कुठल्या न कुठल्या करणावरुन त्यास मारहाण करत होते. रोजच्या मारहाणीच्या त्रासाला कंटाळून त्याने दिनांक १२/३/२००२६ रोजी आत्महत्या केली आहे. त्याच्या सासरवाडीचे लोक हे गुंड प्रवृत्तीचे असून थे आम्हा मयताचे नातेवाईकावर दबाव आनत असून पोलिसही फिर्याद घेण्यात तयार नाहीत. आसे जिल्हा पोलीस अधीक्षकांना दिलेला आर्जात म्हटले होते. त्या नुसार बीड पोलीसात आत्महत्यस प्रावृत केल्या प्रकरणी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १०८ (बीएनएस) ११५(२) (बीएनएस) ३५२ (बीएनएस) ३(५) नुसार गुण्हा दाखल होऊन आरोपी नामे १) पत्नी सुहाना आदम शेख २) मेहुना आमेर आबेद शेख ३) मेहुना सुमेर आबेद शेख ४) सासु मुमताज आबेद शेख सर्व रा. मोहमदिया कॉलनी पेठ बीड या सर्व आरोपींना बेड्या ठोकल्या असल्याचे समजते.